# बृहन्मुंबई महानगरपालिका

उप-आयुक्त (परि.-दोन) यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग कार्यालय, परळ, मुंबई – ४०० ०१२.

क्र. एमडीएफ/२७/जन, दिनांक - ११.०५.२०२०

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव – २०२०

संदर्भ :- १. क्र. एमडीएफ/ओडी/११३ /जन, दि. १६.४.१९
२. क्र. एमडीएफ/ओडी/७२७/जन, दि. १०.०७.२०१७
३.क्र. एमडीएफ/ओडी/४१८/जन, दि.१२.०५.२०१७

सार्वजनिक गणेशोत्सव-२०२० च्या संदर्भात पुढील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत –

**गणपतीच्या मूर्ती तयार करण्यासाठी तात्पुरते मंडप (मूर्तीकारांचे मंडप)बांधण्याबाबत :**

१. मंडपाच्या परवानगीबाबत – मूर्तीकारांच्या मंडपांसाठी आकारण्यात येणा-या परवानगीच्या शुल्कात दरवर्षी १०% नी वाढ करण्यात येते. तथापि कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील सर्वस्तरीय आर्थिक समस्यांचा विचार करता यावर्षी १०% दरवाढ लागू केली जाणार नाही व सन २०१९ मध्ये लागू असलेले शुल्कदर यावर्षीही लागू होतील. याबाबत प्रतीवर्षीप्रमाणे सर्वसाधारण ३ प्रकारची वर्गवारी करण्यात येईल, त्यानुसार परवानगीचे दर खालीलप्रमाणे असतील :

| आकारमान | सन २०२० साठी लागू असलेले शुल्क |
|---|---|
| ५०० चौ. फुटापर्यंत | रु. ८७०/- + लागू असलेला जीएसटी |
| ५०० ते १००० चौ. फुटापर्यंत | रु. १३२०/- + लागू असलेला जीएसटी |
| १००० चौ. फुटापेक्षा जास्त | रु.१७४०/- + लागू असलेला जीएसटी |

२. प्रत्येक मंडपाकरिता अनामत रक्कम रु. ३४९०/- एवढी देय असेल.

३. खाजगी जमिनीवर जमीन मालकाच्या परवानगीने उभारावयाच्या मंडपांबाबत क्षेत्रफळ विचारात न घेता, रु. १७४०/- + लागू असलेला जीएसटी इतके शुल्क आकारुन परवानगी दिली जाईल.

४. विभाग कार्यालयामार्फत मूर्तीकार व मंडपाना परवानगी देताना परिपत्रक क्र. एमडीएफ/४१८/जन, दि.१२.०५.२०१७ मधील तरतूदी विचारात घेण्यात येतील.

५. जर काही कारणाने मूर्तीकाराचे घर किंवा मूर्ती बनविण्याच्या जागा प्रकल्पबाधित झाल्यास संदर्भाधीन परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता होत असल्यास नवीन ठिकाणी पूर्वीइतक्याच क्षेत्रफळाची परवानगी प्रचलित नियमानुसार देण्यास हरकत नाही.

६. जर जुन्या मूर्तीकाराने अर्ज केला नाही तर त्याच जागेसाठी नवीन मूर्तीकारास प्रथम आलेल्यास प्राधान्य या तत्वाने परवानगी देण्यात येईल. परंतु जागेचे आकारमान आणि एकूण मंडपाची संख्या यात बदल होणार नाही.

७. सार्वजनिक जागेवर मूर्तीकार/मंडपांसाठी नव्याने अर्ज आल्यास विभागीय कार्यालयाकडून परिपत्रक क्र.एमडीएफ/ओडी/४१८/जन दि. १२.०५.२०१७ मधील तरतूदीप्रमाणे तपासणी करण्यात यावी. स्थानिक पोलिस स्टेशन, वाहतूक पोलिस यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमूद परिपत्रकातील तरतूदी विचारात घेऊन परिमंडळीय उपायुक्त यांच्या मान्यतेनंतर उचित कार्यवाही करावी. खाजगी जागेवर अशाप्रकारची परवानगी मागणारा मूर्तीकार हा पारंपारिक मूर्तीकार असणे अनिवार्य असेल व त्यास शहर तथा दोन्ही उपनगरांमधून कोणत्याही एकाच ठिकाणी परवानगी देता येईल. मूर्तीकारांसाठी परवानगी देताना बरेचदा मूर्ती विक्रीसाठी परवानग्या दिल्या जातात असे आढळून आले होते त्यामुळे याची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

८. मूर्तिकार व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारण्यासाठी रस्ते/फूटपाथवर खड्डे खणू नयेत, अन्यथा नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

९. सदर सूचना नवरात्र व अन्य उत्सवांदरम्यानही लागू राहतील. त्यासाठी स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येणार नाही.

१०. यावर्षी परिपत्रकाव्दारे देण्यात येणा-या परवानग्या कोरोना साथरोग आटोक्यात येऊन परिस्थिती पूर्वपदावर आल्यावर / यथास्थिती शासकीय निर्देशानुसार देण्यात येतील.

सही/- १३.०४.२०२०
सह आयुक्त (परि.-दोन)

सही/- १७.०४.२०२०
अति. आयुक्त (पूर्व उपनगरे)

**प्रत –**

**उप-आयुक्त (परि.-१, ३, ४, ५, ६, ७)**, महोदय,
**सहाय्यक आयुक्त( अे ते टी विभाग)**, महोदय,
**अनुज्ञापन अधिक्षक** , महोदय,

(प्र आयुक्त) 11/5/2020

सह आयुक्त (परि.-दोन)
यांचे प्रशासकीय अधिकारी

सार्वजनिक गणेशोत्सव २०२० च्या संदर्भातील मार्गदर्शक सूचना आपल्या माहितीकरिता पाठविण्यात येत आहेत.

प्रत-

मा.मनपा आयुक्त यांचे स्वीय चिटणीस

अतिरिक्त आयुक्त (शहर) यांचे स्वीय चिटणीस

अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस

अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय चिटणीस

सह आयुक्त (परि.-दोन)<br>
यांचे प्रशासकीय अधिकारी